जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - RB
आवक क्र. -
१६ MAR 2006

शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा
देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : जमीन १०/२००५/प्र.क्र.३८/ज-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ७.३.२००६

पहा :- १) शासन परिपत्रक,महसूल व वन विभाग क्र.एलएनडी १०७१/ १८३७३६/ ए-II, दि.९/९/१९७१ व दि.२५/२/१९७२
२) शासन परिपत्रक, ,महसूल व वन विभाग क्र.जमीन १०/२००५/प्र.क्र.३७/ज-१, दि.७/४/२००५

प्रस्तावना :-

शासन परिपत्रक,महसूल व वन विभाग क्र.एलएनडी १०७१/ १८३७३६/ ए-II, दि.९/९/१९७१ व दि.२५/२/१९७२ अन्वये राज्य शासनाच्या/केंद्र शासनाच्या विविध विभागांना/उपक्रमांना आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्राप्त झाले आहेत. या आदेशाचे पुनर्विलोकन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती व सदर पुनर्विलोकन होईपर्यंतच्या कालावधीसाठी शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.जमीन १०/२००५/ प्र.क्र.३७/ज-१, दि.७/४/२००५ अन्वये (पुनर्विलोकन होऊन नव्याने आदेश प्राप्त होईपर्यंत) जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी शासकीय जमिनीचा, शासनाच्या पूर्वमंजूरीशिवाय आगाऊ ताबा, कोठल्याही प्रयोजनासाठी, कोणत्याही प्रकरणात (शासनाचे इतर विभागासहीत) देऊ नये आणि जमीन वाटपाचा प्रस्ताव त्यांच्या शिफारसीसह शासनाकडे सादर करावा अशा सूचना देण्यात आल्या.

शासन निर्णय :-

२. शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याबाबत शासनाने सर्वकष विचार करुन खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

(१) शासन परिपत्रक,महसूल व वन विभाग क्र.एलएनडी १०७१/ १८३७३६/ ए-II, दि.९/९/१९७१ व दि.२५/२/१९७२ मधील सूचना याव्दारे रद्द करण्यात येत आहेत.

(२) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.जमीन १०/२००५/प्र.क्र.३७ /ज-१, दि.७/४/२००५ मधील सूचना याव्दारे रद्द करण्यात येत आहेत.

(३) खालील अपवादात्मक प्रकरणात, निर्बाधरित्या वाटपास उपलब्ध असलेल्या नगरपालिका/नगरपरिषद हद्दीतील शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा राज्य/केंद्र शासनाच्या विविध विभागांना/ उपक्रमांना देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रत्यायोजित करण्यात येत आहेत :-

(क) केंद्र शासनाचे दूरसंचार विभागाच्या, दूरध्वनी केंद्रासाठी, कार्यालयासाठी व मनोऱ्यासाठी त्यांना आवश्यक असलेली शासकीय जागा.

RB - 5
MAR 2006

(ख) वीज उपकेंद्राची स्थापना करणे व त्यांच्याशी संबंधित कार्यालय या प्रयोजनासाठी महाराष्ट्र शासनाची विद्युत कंपनी (पूर्वीचे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ) यांना आवश्यक असलेली शासकीय जागा.

(ग) महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या वसाहती उभारण्यासाठी त्यांना आवश्यक असलेली, महानगरपालिका क्षेत्राबाहेरील शासकीय जागा.

(घ) घन कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी उभारावयाच्या प्रकल्पाकरीता नगरपालिका/नगर परिषदा यांच्या क्षेत्राबाहेर या प्रयोजनासाठी, संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी शिफारस केलेली शासकीय जागा.

(च) गृह निर्माण व विशेष सहाय्य विभागाच्या 'लोक आवास योजना' व 'ग्रामीण निवारा योजना' यासाठी त्यांना आवश्यक असलेली महानगरपालिका क्षेत्राबाहेरील शासकीय जागा.

(छ) 'वाल्मिकी आंबेडकर आवास योजने'साठी आवश्यक असलेली महानगरपालिका क्षेत्राबाहेरील आवश्यक शासकीय जागा.

(ज) ५०% केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कक्ष बांधकाम तसेच तलाठी कार्यालय तथा निवासस्थान या योजनांसाठी त्यांना आवश्यक असलेली महानगरपालिका क्षेत्राबाहेरील शासकीय जागा.

(झ) नवनिर्मित तालुका व जिल्हा येथील अनुक्रमे तहसिल व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासाठी आवश्यक असलेली शासकीय जागा.

(ट) नगरपालिका/नगर परिषदा यांच्या शासनमान्य विकास आराखडयात (प्रारुप किंवा प्रस्तावित विकास आराखडा नव्हे) विविध प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या जमिनीबाबत :-

(i) रस्ते, बगिचा, खेळाचे मैदान, उद्यान, पाणीपुरवठा, वीज पुरवठा, पथदीप, मलनिस्सारण, सांडपाणी, सार्वजनिक सौचालय, स्मशानभूमी, दफनभूमी या प्रयोजनासाठी विकास आराखडयात आरक्षित असलेल्या शासकीय जमीनी स्थानिक स्वराज्य संस्थांना विनामुल्य देण्याची तरतूद शासन परिपत्रक क्र. LND 1083/2702/ C.R. 1909/G-6, दिनांक ४.२.१९८३ मध्ये असल्याने त्या प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या शासकीय जागेचा नगरपरिषदा/नगरपालिकांना आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

(ii) दि.४.२.१९८३ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र II (i) मध्ये सार्वजनिक सुविधांसाठी (Public convenience) आरक्षित असलेल्या शासकीय जागा स्थानिक स्वराज्य संस्थांना विनामुल्य देण्याची तरतूद असली तरीही (ट) (i) मधील नमुद केलेले वापर वगळून इतर एखादा प्रस्तावित वापर हा सार्वजनिक सुविधेमध्ये (Public convenience) मोडतो का याबाबत शासनाचे मार्गदर्शन घेतल्याशिवाय अशा प्रकरणात आगाऊ ताबा देण्यात येऊ नये.

(iii) नाटयगृह, सांस्कृतीक भवन या सार्वजनिक प्रयोजनासाठी ((Public Purpose) विकास आराखडयात आरक्षित असलेल्या शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा नगरपरिषदा/ नगरपालिका यांनी मागितल्यास अशा जागेची प्रारुप विकास आराखडा प्रसिध्द होण्याच्या दिनांकाची बाजारभावाची किंमत वसूल केल्यानंतरच अशा जमिनींचा आगाऊ ताबा नगरपरिषदा/नगरपालिका यांना देण्यात यावा.

सार्वजनिक सुविधा (Public convenience) व सार्वजनिक प्रयोजन (Public Purpose) हे दोन्ही शब्दप्रयोग भिन्न आहेत याची कृपया नोंद घेण्यात यावी.

(iv) दि.४.२.१९८३ च्या शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. II (iii) मध्ये नमुद केल्यानुसार इतर कारणांसाठी (जसे की व्यापारी संकुल, व्यापारी गाळे इ.) विकास आराखडयात आरक्षित असलेल्या शासकीय जमिनींचा आगाऊ ताबा देण्यापूर्वी अशा जमिनींची ताबा देण्याच्या दिनांकास

असलेली बाजारभावाची किंमत वसूल केल्याशिवाय अशा शासकीय जमिनींचा आगाऊ ताबा देण्यात येऊ नये.

३. महानगरपालिकेच्या क्षेत्रातील, विकास आराखडयात कोणत्याही प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा शासनाच्या **पूर्व मान्यतेशिवाय महानगरपालिकेस अथवा राज्य व केंद्र शासनाच्या कोणत्याही विभागास/उपक्रमास वा अन्य संस्थेस देण्यात येऊ नये.**

४. जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांना महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील तरतूदीनुसार त्यांना असलेल्या वित्तीय अधिकारात जमीन वाटपाची कार्यवाही करण्यास, उक्त नियमांच्या नियम, ५० मधील तरतूदीस अधीन राहून, कोणत्याही प्रकारचे निर्बंध घालण्यात आलेले नाहीत.

५. हा शासन निर्णय नगर विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(प्र. ज. मुळे)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत : [illegible]